# विद्यार्थ्यांना मेट्रोचे कुतूहल



मुंबई : देशातील पहिली भूमिगत मेट्रो मुंबईत सुरू होणार असून, या मेट्रो प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या मेट्रोची माहिती देणारे प्रदर्शन एनसीपीएच्या पिरामल गॅलरीत भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाला मुंबईतील विद्यार्थ्यांनी भेट दिली. पालिकेच्या ५०० विद्यार्थ्यांसह २० शिक्षकांनी या प्रदर्शनाला भेट दिली.